अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २४ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ५५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## 'सुर्या' चमकला; भारताचा ऑस्ट्रेलियावर विजय




**विशाखपट्टणम** : भारताच्या युवा संघाने यावेळी ऑस्ट्रेलियाचा वर्ल्ड कपमधील पराभवाचा बदल घेतला. कर्णधार सूर्यकुमार यादवच्या धडाकेबाज अर्धशतकी खेळीच्या जोरावर आणि रिंकू सिंगने फिनिशिंग टचने भारताने ऑस्ट्रेलियावर दोन विकेट्स राखत थरारक विजय मिळवला.

या विजयासह भारताने या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. सूर्याने यावेळी ४२ चेंडूंत ९ चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर ८० धावांची धमाकेदार खेळी साकारली. भारताच्या डावाची आक्रमक सुरुवात यशस्वी जैस्वालने केली. पण यावेळी दुहेरी धाव घेण्याच्या नादात यशस्वी आणि ऋतुराज गायकवाड यांच्यात ताळमेळ जमला नाही. एकही चेंडू न खेळता ऋतुराज बाद झाला. सूर्या आणि इशान किशन यांची चांगली जोडी जमली होती. ही जोडी भारताला मोठी धावसंख्या उभारून देईल, असे वाटत होते. या दोघांनीही अर्धशतकं झळकावली. ऑस्ट्रेलियाकडून इंग्लिशने धडाकेबाज फटकेबाजी सुरु ठेवली आणि ४७ चेंडूंतच आपले शतक पूर्ण केले. फक्त ५० चेंडूंत ११ चौकार आणि आठ षटकारांच्या जोरावर ११० धावांची खेळी साकारली.

# बा विठ्ठला! जनतेच्या सर्व मनोकामना पूर्ण कर

सुराज्य/पंढरपूर

**बा विठ्ठला! राज्यातील सर्व जनतेला सुखी समाधानी ठेव. शेतकरी, कष्टकरी समाजासमोरील संकटे दूर करून त्यांना समाधानी ठेव. समाजातील सर्व घटकांच्या मनोकामना पूर्ण करण्याची शक्ती, आशीर्वाद द्यावा, असे साकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्तिकी एकादशीनिमित्त आयोजित शासकीय महापुजेच्याप्रसंगी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले.**

- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे श्री विठ्ठलचरणी साकडे
- कार्तिकी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणींची शासकीय महापूजा
- नाशिक जिल्ह्यातील बबन घुगे- वत्सला घुगे ठरले मानाचे वारकरी
- श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, परिवार देवता विकास संवर्धन आराखड्याच्या पहिल्या टप्प्यातील २६ कोटीच्या कामाचा शुभारंभ

### मानाचे वारकरी

कार्तिकी एकादशी यात्राः २०२३ निमित्त गुरुवार, दि. २३ नोव्हेंबर २०२३ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणाऱ्या शासकीय महापूजेस उपस्थित राहणाऱ्या मानाच्या वारकरी निवडीसाठी दर्शन रांगेतून माळकरी भाविकांची निवड करण्यात आली. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील माळेदुमाला येथील शेतकरी बबन विठोबा घुगे आणि वत्सला बबन घुगे या दांम्पत्यांची मानाचे वारकरी म्हणून निवड करण्यात आली. हे शेतकरी दांम्पत्य गेल्या पंधरा वर्षांपासून नियमितपणे पंढरीची वारी करीत आहेत. या दांम्पत्याला उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते वर्षभर मोफत एसटी पास देण्यात आला.







महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीची कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री फडणवीस व अमृता फडणवीस यांच्या हस्ते पार पडली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. तानाजी सावंत, कामगार मंत्री सुरेश खाडे, आ. रणजीतसिंह मोहिते-पाटील, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, राणा जगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, कोल्हापूर पोलीस परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय अधिकारी गजानन गुरव उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भागवत धर्माची पताका पिढ्यानपिढ्या वारकरी संप्रदाय पुढे घेऊन जात आहे. धर्मावर कितीही आक्रमणे झाली. संकटे समोर आली तरी हा वारकरी संप्रदाय कधीही थांबला नाही. त्यांच्या पावलांनी नेहमीच पंढरीची वाट धरली. महाराष्ट्र धर्म वारकऱ्यांनी जिवंत ठेवला असून, महाराष्ट्र धर्माचा पाया ज्ञानेश्वर माऊलींनी घालून दिला. संत तुकाराम महाराजांनी त्यावर कळस चढवला. सर्व संतांनी त्यांच्या विचार व आचरणातून सामान्य माणसाला असामान्य बनवले. अनेक पिढ्या बदलल्या. परंतु भागवत धर्मावरील लोकांची श्रध्दा बदलली नाही. मागील वर्षीच्या कार्तिकीला श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता संवर्धनाची संकल्पना मांडली होती. तर या कार्तिकीला मंदिर संवर्धन विकासासाठी मंजूर केलेल्या ७३ कोटींच्या निधीतून पहिल्या टप्प्यातील २६ कोटींच्या विविध संवर्धन विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. त्याबद्दल समाधान वाटत असून, हे काम अत्यंत वेगाने व उत्कृष्ट दर्जाचे होईल, यासाठी सर्व संबंधित शासकिय यंत्रणा व संबंधित ठेकेदारांनी काळजी घेतली पाहिजे, असे निर्देश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. दुसऱ्या टप्प्यातील कामांनाही लवकरच सुरुवात करण्यात येणार असून, पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची कामे सर्वांना सोबत, विश्वासात घेऊन करण्यात येतील. विस्थापित व्हावे लागणार नाही, कोणाचेही नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. चंद्रभागा नदी अविरतपणे वाहत राहिली पाहिजे यासाठी नदी संवर्धनाचे सर्व उपाययोजना करण्यात येतील. नदी स्वच्छ राहिली पाहिजे, यासाठी नदी पात्रात नदी काठावरील सर्व गावातून येणारे पाणी हे स्वच्छ करूनच नदीत येईल, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

यावेळी उपमुख्यमंत्री फडवणीस यांनी यात्रा कालावधीत जिल्हा प्रशासन व मंदिर समितीने भाविकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधेबद्दल कौतुक केले.

## कंपनीकडून खरेदी केलेली जुनी गाडी मूळ मालकाने दमदाटी करून नेली

सुराज्य/मोहोळ

### चौघांवर गुन्हा दाखल

बँकेकडून थकीत कर्ज धारकाकडून जप्त केलेले वाहन रितसर खरेदी केलेले असतानाही मूळ मालक व त्याच्या सहकाऱ्यांनी दमदाटी शिविगाळ करीत जिवे मारण्याची धमकी देऊन गाडी घेऊन गेले. त्यामुळे त्या गाडीच्या मूळ मालकांसह चौघाविरुद्ध मोहोळ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुलिंगप्पा नरसप्पा रामपूरकर (दिशा रेसीडन्सी) यांनी प्लॅटीनम मोर्टस, पुणे यांच्याकडून (एम.एच.-१३ सी.एस. ४६३७) चार चाकी वाहन आरटीजीएसद्वारे सात लाख ४१ हजार रुपये पेमेंट देऊन रितसर खरेदी केले. त्यावेळी रामपूरकर यांनी आरसी बुकची मागणी केली असता सदरचे वाहन हे करकंब येथील दत्तात्रय दगडू कांबळे या मूळ मालकाचे असून, हप्ते थकल्याने सदर वाहन आयसीआयसीआय बँकेने जप्त केले होते. त्यांनी लिलाव काढल्यानंतर सदरचे वाहन सहारा मोटर्सने खरेदी केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर सहारा मोटर्स कंपनीने प्लॅटीनम मोटार्सला विकले. त्यांच्याकडून गुरु लिंगप्पा रामपूरकर यांनी सात लाख ४१ हजार रुपये देऊन खरेदी केले होते.

दरम्यान, ते डिझायर हे चारचाकी वाहन घेऊन त्यांच्या ड्रायव्हर अशोक कुमार तितोलियासमवेत सोलापूरहून टेंभुर्णीकडे जात असताना मोहोळ येथील कन्या प्रशालेजवळ मोटार सायकलवरून एक पुरुष, एक महि वाहनासमोर येऊन वाहन बाजूला घेण्यास सांगितले. त्यानंतर हे वाहन आमच्या मालकीचे आहे. वाहनाची चावी दे, म्हणून शिविगाळ, दमदाटी करू लागले. दरम्यान, स्वराज्य हॉटेलजवळ ते वाहनातून खाली उतरून फोनवर बोलताना पुरुष, महिलाही तेथे आले. त्यांच्यासोबत आणखी एक मोटारसायकलवर दोघे आले. वाहन विकत घेतलेल्या एजंटला फोनवर बोलत असताना एकाने डावा हात पकडला. एकाने पँटच्या खिशात हात घालून जबरदस्तीने चावी काढून घेतली. तुला काय करायचे ते कर, सदर वाहन माझ्या नावावर असून, माझे नाव दत्तात्रय दगडू कांबळे (बुधवार पेठ करकंब) असल्याचे सांगितले. दरम्यान, त्या चौघांनी मिळून शिविगाळ दमदाटी करून जिवे मारण्याची धमकी देऊन वाहन घेऊन गेले. त्यानंतर मोहोळ पोलीस ठाण्यात गाडीचे मूळ मालक दत्तात्रय दगडू कांबळेसह दोन पुरुष व एक महिला अशा चौघांविरुद्ध मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## ओबीसी, मराठासह खुला प्रवर्गातील जातींच्या मागासलेपणाचे निकष निश्चित

**मुंबई** : मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असतांना, हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारकडून सर्वच पद्धतीने प्रयत्न केले जात आहे. दरम्यान, अशात राज्य सरकारकडून आता मागासवर्ग आयोगाला देखील सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर पुण्यात राज्य मागासवर्ग आयोगाची गुरूवारी बैठक पार पडली. आजच्या बैठकीत मराठा समाजासह, ओबीसी आणि इतर खुल्या प्रवर्गातील जातींमधील मागासलेपणाचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. जवळपास २० निकष आजच्या बैठकीत निश्चित झाले. राज्यात आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा समाज, ओबीसी समाजाच्या नेत्यांमध्ये दावे-प्रतिदावे करण्यात येत आहे. त्याशिवाय, धनगर समाजाकडूनही आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर राज्य मागासवर्ग आयोगाची बैठक पार पडली.

### कोणते निर्णय झाले?

ओबीसी, व्हीजेएनटी आणि मराठा समाजासह खुल्या प्रवर्गातील सर्व समाज घटकांचे आयोगाकडून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणासाठीचे निकष एकसमान असतील असा धोरणात्मक निर्णय आयोगाने घेतला आहे. याचा अर्थ सर्व समाज घटकांचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण मोजण्याचे निकष एकच असणार आहे.

## प्रकाश राज यांना ईडीचे समन्स



**मुंबई** : अभिनेता प्रकाश राज यांना प्रणव ज्वेलर्स मनी लाँड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने समन्स बजावले आहे. पॉन्झी स्कीम घोटाळ्याप्रकरणी ईडीने तामिळनाडूतील त्रिची येथील प्रसिद्ध प्रणव ज्वेलर्सवर छापा टाकला होता. प्रकाश राज हे प्रणव ज्वेलर्सची जाहिरात करतात. छापेमारीनंतर तपास यंत्रणेने आता प्रकाश राज यांना नोटीस पाठवली आहे.

## सरकारी कर्मचारी मालामाल; महागाई भत्त्यात वाढ

**मुंबई** : राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ केली आहे. राज्य सरकारने चार टक्क्यांनी महागाई भत्ता वाढवला आहे.



राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे महागाई भत्ता आता ४२ टक्क्यावरुन आता ४६ टक्के करण्यात आला आहे. एक जुलै २०२३ पासूनची महागाई भत्त्याची थकबाकीही मिळणार आहे. राज्य सरकारकडून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आलाय.

मागील अनेक दिवसांपासून महागाई भत्ता वाढवण्याची मागणी करण्यात येत होती. वर्षातून दोन वेळा महागाई भत्ता वाढवला जातो. आज अर्थ विभागाने शासन निर्णय काढून महागाई भत्ता वाढवण्यात येत असल्याचा निर्णय जाहीर केला आहे. याआधी ३० जून २०२३ रोजी राज्य सरकारने कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात चार टक्के वाढ केली होती. राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जुलै, २०२३ पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४२ % वरुन ४६ % करण्यात यावा. सदर महागाई भत्ता वाढ दिनांक १ जुलै, २०२३ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीतील थकबाकीसह नोव्हेंबर, २०२३ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी.

महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील. यावर होणारा खर्च संबंधित शासकिय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदात्रातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



फळं खा, म्हणाले तर...
'फ्रूट बिअर' मागतोय !

कल्याण
289-98-378

मुंबई
290-15-339

# प्रत्येक जिल्ह्यातील एसटी बस स्थानकावर 'आपला दवाखाना'

## एसटी ताफ्यात लवकरच ३४९५ नवीन गाड्या दाखल होणार

सुराज्य/मुंबई

राज्यातील प्रत्येक बस स्थानकावर महिला बचत गटासाठी एक स्टॉल आणि जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या बस स्थानकावर 'आपला दवाखाना' सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी राज्य परिवहन महामंडळाला दिले.

प्रवाशांना चांगल्या सुविधेसाठी महामंडळाच्या ताफ्यात नवीन वर्षांत ३ हजार ४९५ एसटी बसेस दाखल होणार असून बस स्थानकांच्या स्वच्छतेला प्राधान्य देतानाच त्यांचा चेहरामोहरा बदलण्याचे आदेशही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यात ३४९५ नवीन गाडया खरेदी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. महामंडळाला २० नोव्हेंबरला एका दिवशी ३६.७३ कोटी रुपये विक्रमी उत्पन्न झाल्याबद्दल शिंदे यांनी अभिनंदन केले. राज्यातील सामान्य नागरिकांना एसटीच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी महामंडळाने प्रयत्न केले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. या वेळी २२०० साध्या बस घेण्यास मंजुरी दिली. या २२०० परिवर्तन साध्या बस मार्च २०२४ अखेर एसटीच्या ताफ्यात दाखल होतील. याबरोबरच एसटीच्या २१ वेगवेगळ्या विभागांसाठी १२९५ बस भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रस्तावास बैठकीत मान्यता देण्यात आली.



राज्यातील एकूण बस स्थानकांपैकी १० टक्के ठिकाणी माजी सैनिकांच्या पत्नींना स्टॉल देण्याच्या निर्णयाला मंजुरी देतानाच मुख्यमंत्र्यांनी महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक बस स्थानकावर एक स्टॉल देण्याचे आदेश दिले. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्याशी चर्चा करून योजना तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. त्याचप्रमाणे एसटीतर्फे येत्या दोन वर्षांत ५१५० ई-बस भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. जिल्हा आणि तालुकास्तरावर त्यांची सेवा देण्यात येणार आहे. या बससेवेकरिता सामान्यांना परवडेल असेच तिकिट दर ठेवण्याचे आदेश या वेळी दिले. सामान्यांना चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी राज्यात सुरू करण्यात आलेले 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' मोठ्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणच्या बस स्थानकांवर सुरू करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. या वेळी परदेशी शिक्षण अग्रिम योजना, धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान याबाबत मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला.

## हॉटेल चालकास मारहाण; पैसे पळविले

सुराज्य/सोलापूर

पैशाच्या देवाण-घेवाणीच्या वादातून हॉटेल चालकास मारहाण करून त्याच्या काउंटरमधील १५ हजार रुपये घेऊन पळून गेल्याची घटना अंबड (माढा) येथील हॉटेलवर घडली.

समाधान तात्यासाहेब लोंढे (वय- २५, पिंपळनेर) असे जखमी हॉटेल चालकाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दीपक आणि त्याचा भाऊ संतोष सुभाष लोंढे यांच्याविरुद्ध कुर्डूवाडीच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तात्या लोंढे हे आपल्या हॉटेलमध्ये काम करीत होते. त्यावेळी दोघेजण येऊन तुझ्याकडे आमचे पैसे निघतात. ते आत्ताच्या आत्ता दे, असे म्हणत त्यांना मारहाण केली. आपल्याकडे पैसे नाहीत, असे म्हणताच दोघांनी काऊंटामधून १५ हजार रुपये घेऊन पसार झाले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. तपास हवालदार घोरपडे करीत आहेत.